| MHAH190004812021 | |
|---|---|
| | खटला दाखल दिनांक – २५/०३/२०२१ |
| | खटला नोंदणी दिनांक – २५/०३/२०२१ |
| | निकाल दिनांक – १७/०३/२०२६ |
| | कालावधी – ०४ वर्षे, ११ महिने, २३ दिवस. |

| | |
|---|---|
| | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.०२), शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात..**<br>( पीठासीन अधिकारी – वैशाली सं. मोरे )<br>**नियमित फौजदारी खटला क्र.५१/२०२१ निशाणी.क्र.३१** |
| | गुं. रजि. क्र.३०/२०२१ शेवगाव पोलिस स्टेशन, शेवगाव. |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन तर्फे पोलिस अधिकारी, शेवगाव पोलिस स्टेशन, शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर. |
| **सरकारतर्फे** | सहाय्यक सरकारी अभियोक्ता, श्री. एस. एस. दराडे. |
| **आरोपी** | **१. संजय आनंद कापकर**,<br>वयः– ४६ वर्षे, कामधंदाः– शेती,<br>**२. कृष्णा संजय कापकर**,<br>वयः– १९ वर्षे, कामधंदाः– शेती,<br>**३. मिराबाई संजय कापकर,**<br>वयः– ३६ वर्षे, कामधंदाः– शेती,<br>सर्व रा. घुले जिनिंगच्या शेजारी, शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर. |
| **आरोपीतर्फे** | विधिज्ञ श्री. एम. व्ही. थोरात. |
| **गुन्हा** | भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | – | १७/०१/२०२१ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | – | १७/०१/२०२१ |
| दोषारोप पत्र दाखल झाल्याचा दिनांक | – | २५/०३/२०२१ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | – | २२/०३/२०२४ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | – | १४/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक | – | –– |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | – | १७/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषीत केल्याची दिनांक | – | १७/०३/२०२६ |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संजय आनंद कापकर | २९/०१/२०२१ | २९/०१/२०२१ | भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४ सह कलम ३४ प्रमाणे. | निर्दोष | निरंक | निरंक |
| २ | कृष्णा संजय कापकर | २९/०१/२०२१ | २९/०१/२०२१ | | | | |
| ३ | मिराबाई संजय कापकर | २९/०१/२०२१ | २९/०१/२०२१ | | | | |

## अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी/ बचाव/ न्यायालयाचे साक्षीदार

### अ) अभियोग पक्ष

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सा.क्र.१(नि.क्र.२९) | ज्ञानेश्वर रामदास कापकर | फिर्यादी |

### ब) बचाव साक्षीदार

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| –– | निरंक | –– |

**क) कोर्ट साक्षीदार**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

**अभियोग पक्षाचे/ बचाव /न्यायालयाचे निशाणी**

**अ) अभियोग पक्ष**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ब) बचाव**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| -- | निरंक | निरंक |

**क) कोर्ट निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | १२ | दोषारोप |
| २ | १३ ते १५ | आरोपीची प्ली. |

**ड) मुद्देमाल**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | -- | -- |

**न्यायनिर्णय**

**(पारित दि.१७/०३/२०२६)**

०१. आरोपीं भारतीय दंड विधान चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये अपराधाच्या आरोपासाठी संपरीक्षेला समोरे गेले आहेत.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे आहे –**

०२. फिर्यादी – ज्ञानेश्वर रामदास कापकर, रा. घुले जिनींग शेजारी, शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर यांनी दिनांक १८/०१/२०२१ रोजी पोलीस स्टेशन, शेवगाव येथे फिर्याद दिली की, ते खाजगी नोकरी तसेच शेती व्यवासाय करुन कुटुंबाची उपजिवीका भागवितात. त्यांचे शेजारी त्यांचे चुलते संजय आनंद कापकर हे राहण्यास असुन ते फिर्यादी सोबत शेतीचे कारणावरुन नेहमी वाद घालत असतात. दिनांक १७/०१/२०२१ रोजी, रात्री ११.३० वा. चे सुमारास, त्यांचे चुलते संजय, चुलत्याचा मुलगा कृष्णा यांनी त्यांचे घरासमोर येऊन मोठ–मोठ्याने त्यांना शिवीगाळ केली. त्यावेळी फिर्यादीने त्यांना शिवीगाळ का करता असे विचारले असता आरोपी संजय ने फिर्यादीस वाटणीमध्ये मध्ये जास्त जमीन आली व त्यास कमी जमीन आली आहे असे म्हणून काही एक विचार न करता लोखंडी गजाने फिर्यादीस डोक्यात मारहाण केली. फिर्यादी मार लागल्यामुळे खाली पडले असता आरोपी कृष्णा व मिराबाई यांनी फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहान केली आणि घाण–घाण शिवीगाळ केली. तसेच आरोपींनी फिर्यादीस जर परत आमचे नादाला लागले तर तुंम्हाला जिवे ठार मारुन टाकु अशी धमकी दिली. त्यानंतर फिर्यादी तक्रार देणे करीता पोलीस स्टेशनला गेला असता त्यास औषधोपचासाठी मेमो देण्यात आला व ग्रामीण रुग्णालय, शेवगाव येथे उपचार घेतले व पोलीस स्टेशन, शेवगाव येथे सदरची तक्रार दिली.

०३. फिर्यादीचे उपरोक्त फिर्यादवरुन आरोपी विरुध्द गुन्हा क्र.३०/२०२१ हा भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंदविण्यात आला. तपासामध्ये तपासीक अमलदार यांनी घटनास्थळ पंचनामा तसेच मुद्देमाल जप्ती पंचनामा केला. जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले आणि साक्षीदारांचे जबाब नोंदविले.

तपासाअंती आरोपींविरुध्द पुरावा आल्याने त्यांचे विरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

०४. आरोपींविरुध्द निशाणी क्र.१२ वर भारतीय दंड विधान चे कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप निश्चीत केला. आरोपींनी सदरचा दोषारोप मातृभाषेत समजावून सांगितला, आरोपींनी गुन्हा ना–कबूल केल्याने प्रकरणाची संपरिक्षा घेण्यात आली.

०५. अभिलेखावरील तथ्यकथन व पुराव्यावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ उद्भवतात व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक १७/०१/२०२१ रोजी, रात्री ११.०० वा. चे सुमारास, घुले जिनींग शेजारी, शेवगाव, ता. शेवगाव येथील फिर्यादीचे घरासमोर आरोपी क्र.०१ ने आरोपी क्र.०२ व ०३ यांचेसह आपसात संगनमत करुन समान उद्देशाचे पुरसरनार्थ फिर्यादीस लोखंडी गज या हत्याराने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली आणि त्याव्दारे भारतीय दंड विधान कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | ... नकारार्थी. |
| २ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन समान उद्देशाचे पुरसरनार्थ फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली आणि त्याव्दारे भारतीय दंड विधान कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | ... नकारार्थी. |
| ३ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन समान उद्देशाचे पुरसरनार्थ फिर्यादीने कायदा हातात घ्यावा अगर गैरकृत्य करावे या उद्देशाने त्यांना पक्षोभित केले आणि त्याव्दारे भारतीय दंड विधान कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | ... नकारार्थी |
| ४. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन समान | |

| | | |
|---|---|---|
| | उद्देशाचे पुरसरनार्थ फिर्यादीचे मनात भय उत्पन्न करण्यासाठी त्यास ठार मारण्याची धमकी दिली आणि त्याव्दारे भारतीय दंड संहिता भा.दं.वि. कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला ? | ... नकारार्थी. |
| ५ | काय आदेश | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

०६. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द दोषसिध्दी साठी साक्षीदार क्र.१ फिर्यादी ज्ञानेश्वर रामदास कापकर यांची साक्ष नोंदविली. फिर्यादी व आरोपींमध्ये आपसात तडजोड झाल्यामुळे खटला पुढे चालवायचे नाही अशी पुरसिस निशाणी क्र.२८ वर दाखल केली. त्यामुळे सरकारी पक्षाचा साक्षी पुरावा बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द कोणताही पुरावा मिळून न आल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिते चे कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०७. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

### मुद्दा क्र.०१ ते ०४ करीता –

०८. अभियोग पक्षातर्फे सा.क्र.१ फिर्यादी–ज्ञानेश्वर रामदास कापकर यांनी त्यांचे सरतपासात सांगितले की, घटना सुमारे चार वर्षांपूर्वी रात्री ९.०० वा. चे सुमारास त्यांच्या घरासमोर घडली. त्यांचे आरोपींसोबत शेतीच्या वाटपाचे कारणावरुन किरकोळ वाद झाले होते. वाद झाल्याने तेथे लोकांची गर्दी जमा झाली होती. सदर गर्दीमध्ये कोणी कशाने मारहाण केली हे त्यांना कळाले नाही असे सांगतात. त्यांनी सरकारी दवाखाना, शेवगाव येथे जाऊन उपचार घेतले. या व्यतिरिक्त काही घडले नाही असे सांगतात. तसेच पोलीस ठाण्यात त्यांनी फिर्याद दाखल केली, परंतु, फिर्याद मधील मजकूर आठवत नाही असे सांगतात.

०९. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहयोग दिला नसल्यामुळे अभियोग पक्षाच्या वतीने उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये त्यांना विचारलेल्या सर्व सूचक प्रशांची उत्तरे नकारार्थी दिलेली आहेत. तसेच फिर्याद मधील अधोरेखांकित भाग 'अ' हा पोलीसांनी त्यांच्या सांगण्यावरुन लिहील्याचे नाकारले आहे. तसेच त्यांनी हे मान्य केले की, आरोपी व त्यांची न्यायालया बाहेर तडजोड झाली आहे.

१०. फिर्यादीचे साक्षीवरुन स्पष्ट दिसते की, आरोपीने त्यास लोखंडी गज अथवा अथवा लाथाबुक्यांनी मारहाण केली, शिवीगाळ केली, जिवे मारण्याची धमकी दिली अशी कोणतीही घटना घडल्याचे त्यांनी सांगितले नाही. तसेच आरोपीं सोबत त्यांची तडजोड झाल्याचे व पुढील साक्षीदार तपासायचे नाही अशी पुरसिस निशाणी क्र.३० वर दिल्यामुळे अभियोगपक्षाने पुढील साक्षीदार तपासण्यात स्वारस्य दाखविले नाही. सबब, आरोपी विरुध्द लावलेले दोषारोप सिध्द झाले नाही. त्यामुळे मुददे क्र.०१ ते ०४ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येतात.

<u>मुद्दा क्र.०५ करीता</u> –

११. मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ चे आलेल्या निष्कर्षावरुन आरोपीं हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. त्यामुळे मुद्दा क्र.०५ च्या उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आ दे श..</u>

1) आरोपी क्र.१. संजय आनंद कापकर, २. कृष्णा संजय कापकर आणि ३. मिराबाई संजय कापकर यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड विधान चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये अपराधाच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) सदर आरोपींचे पूर्वीचे जामीन व वैयक्तिक बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३) सदर आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) च्या अनुपालनास्तव प्रत्येकी रु. १५,०००/– नविन जामिन व वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

४) प्रस्तुत प्रकरणातील मुद्देमाल एक लोखंडी गज ज्याचे वर्णन दोषारोपत्रात नमूद आहे, अपिल कालावधीनंतर अपिल झाले नसल्यास कायद्याप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला.)

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.03.23 17:50:53 +0530

दि.१७/०३/२०२६

(वैशाली सं. मोरे ),
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.०२), शेवगाव.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file judgment are same word for word as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | Vaishali S. More, Jt. Civil Judge Jr. Div., & Judicial Magistrate F.C. Shevgaon. |
| Name of Steno | :- | S. B. Pisal Stenographer (G-3) |
| Date of Decision Judgment | :- | 17/03/2026 |
| Signed by Presiding Officer | :- | 23/03/2026 |
| Judgment upload on | :- | 23/03/2026. |